# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरू पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

## माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या ॲपेलेट ऑथॉरिटीसमोर (माननीय राज्य माहिती आयोग, मुंबई)

<u>अपिल क्र.५, ६, ७ व ८/२०१०</u>

सुनावणी दिनांक २८/०४/२०१०

श्री म.सं. राख,
द्वारा : जी.एन. घुगे, प्लॉट नं.जी-८,
सिडको,एन-४, औरंगाबाद ... अपिल करणार

विरुध्द

मा.अपिलीय अधिकारी
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कल्पतरु पॉईंट, सिनेप्लॅनेटसमोर,
सायन सर्कलजवळ, रोड नं.८, सायन,
मुंबई-४०० ०२२ ... प्रतिवादी

## आदेश

अपिल करणार यांनी अपिल क्र.५ ते ८/२०१० असे एकूण चार अपिल्स विहिती माहिती उपलब्ध न झाल्यामुळे, केलेले आहेत. सदरहू अपिलांमध्ये ज्या कारणास्तव अपिल्स केले आणि त्याबाबत त्यांना प्राप्त झालेली किंवा न झालेली माहिती याबाबत खालीलप्रमाणे सुनावणीमध्ये चर्चा झालेली आहे.

१. <u>अपिल क्र.५/२०१०</u>

अपिल करणार यांनी अपिल क्र ५/२०१० हे अपिल खालील माहिती उपलब्ध न झाल्यामुळे केलेले आहे.

अ. मप्रनि मंडळामध्ये नवीन क्षेत्र अधिकाऱ्यांची सरळसेवा पध्दतीने नेमणुक करण्यात आलेली आहे. त्याबाबत ११६ नवीन क्षेत्र अधिकारी यांची भरती करण्यापूर्वी वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून मंजूरी घेणे आवश्यक आहे किंवा नाही?, असल्यास त्याबाबतची प्रत मिळणेबाबत माहिती मागितली होती.

अपिल करणार यांस सदर माहिती उपलब्ध झाली किंवा नाही, असे विचारले असता, त्यांनी सदरहू माहिती प्राप्त करुन देण्यात आलेली नाही असे सांगितले. आस्थापना शाखेमार्फत श्रीयुत ब्रम्हे, कार्यालय अधिक्षक यांच्याकडे याबाबत विचारणा केली असता, त्यांनी असे स्पष्ट केले की, दिनांक २७/४/२०१० च्या पत्राद्वारे मुद्दा क्र.अ-१ यामध्ये असे स्पष्ट करण्यात आलेले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या दिनांक २०/८/२००९ च्या पत्राद्वारे मप्रनि मंडळामध्ये पदे मंजूर करण्यात आलेली असून, त्या अनुषंगाने पदांची भरती करण्यात आलेली आहे.

वरील उत्तरावरुन असे स्पष्ट होते की, मप्रनि मंडळातील क्षेत्र अधिकारी ही पदे पर्यावरण विभागाने मंजूर केलेली आहेत, मात्र, त्यामध्ये अशा पदांना वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून मंजूरी घेणे बंधनकारक आहे किंवा नाही, हे स्पष्ट होऊ शकत नाही.तसेच, त्याबाबत आस्थापना शाखेने योग्य ते स्पष्टीकरण देणे गरजेचे होते.

ब. अपिल करणार यांनी शासन परिपत्रक दिनांक १/७/२००५ नुसार लहान कुटूंब असल्याबाबत योग्य ते प्रतिज्ञापत्र नवीन क्षेत्र अधिकारी यांची नियुक्ती करताना मंडळाने घेतले का? आणि तसे घेणे आवश्यक वाटले नाही का? याबाबत माहिती मागितलेली होती.

त्याबाबत आस्थापना शाखेने दिनांक २७/४/२०१० च्या पत्रामध्ये प्रमाणपत्र घेतलेले नाही असे स्पष्ट केलेले आहे.

क. अपिल करणार यांनी क्षेत्र अधिकारी या पदाबाबत महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर जाहिरात दिली का? असल्यास, त्याबाबतची माहिती मागितलेली होती.

त्याबाबत दिनांक २७/४/२०१० च्या पत्रामध्ये अशी जाहिरात दिलेली नाही असे स्पष्ट करण्यात आलेले आहे.

ड. अपिल करणार यांनी निवड समितीने मुलाखतीमध्ये प्रत्येक उमेदवारांना कशा प्रकारे गुण देण्यात येणार होते, त्याची माहिती व प्रत्यक्षात मुलाखतीसाठी हजर राहिलेल्या उमेदवारांना दिलेल्या गुणांची माहिती मागितलेली होती.

त्याबाबत दिनांक २७/४/२०१० च्या पत्राद्वारे गुणांची यादी जोडलेली असल्याबाबत कळविलेले आहे. अपिल करणार यांनी जरी टंकलेखित गुणांची यादी मिळाली असली तरी, प्रत्यक्षात देण्यात आलेले गुण, त्यावर निवड समितीच्या सदस्यांनी केलेल्या सह्या याची छायांकित प्रत मिळाली नसल्याबाबत सांगितले. अशा परिस्थितीमध्ये आस्थापना शाखेस वरील माहिती छायांकित स्वरुपात प्रामाणित करुन देण्यात येत असल्याबाबत वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी सांगून सदरहू कागदपत्रे दाखवून, अपिल करणार यांना उपलब्ध करुन दिले.

इ. अपिल करणार यांनी सरळ सेवा भरतीसाठी समांतर आरक्षण कार्यान्वित करावयाची कार्यपध्दती याबाबत महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे काटेकोरपणे अनुसरावयाची कार्यपध्दती विहित करण्याबाबत काढलेल्या परिपत्रकाचे पालन करण्याबाबत माहिती मागितलेली होती.

त्याबाबत दिनांक २७/४/२०१० च्या पत्रामध्ये असे स्पष्ट करण्यात आलेले आहे की, अशी कार्यपध्दती अनुसरण्यात आलेली होती आणि त्यासाठी माहिला, प्रकल्पग्रस्त, स्वातंत्र्य सैनिक भरण्यात आलेले आहेत. त्याबाबत अपिल करणार यांनी अशी हरकत घेतली की, मप्रनि मंडळाने दिलेल्या जाहिरातीमध्ये, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्राप्रमाणे विहित नमुन्यात माहिती देण्यात आलेली नाही. आस्थापना शाखेने असे स्पष्ट केले की, मागास वर्गीय आरक्षणाबाबत जाहिरातीमध्ये योग्य ती माहिती देण्यात आलेली होती.

ई अपिल करणार यांनी शासनाच्या दिनांक १०/१२/२००४ च्या परिपत्रकाप्रमाणे निवड समितीमध्ये माहिला अधिकारी असणे अनिवार्य असून, त्यांचे नाव, वर्ग व इतर माहिती आणि समितीमधील सर्व अधिकारी यांचे नाव, वर्ग व पत्ते याबाबतची माहिती मागितलेली होती.

आस्थापना शाखेने निवड समितीमध्ये महिला अधिकारी नसल्याचे कळविले.मात्र, निवड समितीतील इतर अधिकारी याबाबत माहिती दिलेली नसल्याचे स्पष्ट होते. अशी माहिती आस्थापना शाखेने त्वरीत उपलब्ध करुन देत असल्याचे स्पष्ट केले.

उ. अपिल करणार यांनी शासन निर्णय दिनांक १९/१०/२००७ नुसार गट-क पदे भरताना अनुसरावयाची कार्यपध्दती अवलंबिली का?आणि त्याबाबतची माहिती मागितलेली होती.

आस्थापना शाखेने मंडळाच्या सेवाप्रवेश नियमानुसार पदे भरण्याची कार्यपध्दती अवलंबिली आहे, असे उत्तर दिल्याचे आढळते. अपिल करणार यांनी सदरहू शासन निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन न दिल्याबाबत अपिल प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून दिले. तरी, याबाबत आस्थापना शाखेने योग्य ती माहिती उपलब्ध असल्यास, १० दिवसांत उपलब्ध करुन द्यावी किंवा नसल्यास त्याप्रमाणे कळवावे.

ऊ अपिल करणार यांनी सर्व पदांची भरती करतेवेळी आरक्षित, विशेष आरक्षणातील, खुल्या, स्वातंत्र्य सैनिक, प्रकल्प/भुकंपग्रस्त उमेदवारांचे वय किती असावे व त्याबाबतच्या नियमांची प्रत मागितलेली होती.

आस्थापना शाखेने असे शासन निर्णय, शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याबाबत लेखी कळविलेले आढळते. अपिल करणार यांनी असे स्पष्ट केले की, त्यांनी मागितलेल्या माहितीचे हे उत्तर नसून, मप्रनि मंडळाकडे अशी माहिती उपलब्ध आहे किंवा नाही हे स्पष्ट करणे गरजेचे होते. तसेच, अद्यापपावेतो त्यांना असे शासन निर्णय प्राप्त झालेले नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अशा परिस्थितीमध्ये मप्रनि मंडळाने उपलब्ध माहितीवरुन योग्य ते उत्तर देणे इष्ट होईल.

ए. अपिल करणार यांनी जाहिरात दिल्यानंतर, काही पदे मंजूर झाली असतील तर, शासनाच्या परिपत्रकानुसार अशा वाढीव पदांसाठी जाहिरात देणे आवश्यक नाही का? नसल्यास, अशा परिपत्रकाची प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली होती.

त्याबाबत आस्थापना शाखेने शासनाची परिपत्रकाची प्रत जोडली आहे, असे दिनांक २७/४/२०१० च्या उत्तरामध्ये कळविले. मात्र, अपिल करणार यांनी सदरहू शासन निर्णयामध्ये वरीलप्रमाणे आवश्यक माहिती नसल्याचे स्पष्ट केले. तरी आस्थापना शाखेने सदरहू शासन निर्णय तपासून १० दिवसांच्या आत योग्य ती माहिती उपलब्ध करुन द्यावी.

ऐ. अपिल करणार यांनी प्रकल्पग्रस्त कोटयातून, नवीन क्षेत्र अधिकाऱ्यांची निवड याबाबत योग्य ती माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रकल्पग्रस्त उमेदवारांची जेष्ठता यादी मागितलेली होती. तसेच, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, महाराष्ट्र शासन यांना रिक्त पदांबाबत कळविण्यात आलेल्या पत्राची

माहिती, प्रकल्पग्रस्त यादीमध्ये असलेला जेष्ठता क्रमांक, प्रमाणपत्र, कार्यालयीन आदेश आणि बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत तसेच किती जागा प्रकल्पग्रस्त कोटयामध्ये रिकाम्या होत्या, त्यांचे आरक्षण इत्यादी माहिती मागितलेली होती.

आस्थापना शाखेने जिल्हाधिकारी कार्यालयातील जेष्ठता यादी उपलब्ध नसल्याबाबत, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र यांना रिक्त पदांबाबत न कळविल्याबाबत लेखी कळविले. तसेच, प्रमाणपत्र व नियुक्त्यांच्या आदेशाची प्रत जोडली असल्याचे आणि प्रकल्पग्रस्त कोटयामध्ये ११ पदे येत असून, ती भरलेली असून, भुकंपग्रस्तासाठी ४ पदे येतात असे दिनांक २७/४/२०१० पत्राद्वारे अपिलकर्त्यास कळविले. तसेच, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जेष्ठता यादी मागविण्यात आलेली नसल्याचे व त्याबाबत कागदपत्र उपलब्ध नसल्याचे आढळून येत आहे. मात्र, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी आता अशी माहिती मागविण्यात आलेली आहे असे स्पष्ट केले. अशी माहिती प्राप्त होताच, उपलब्ध करुन दिली जाईल, असे सांगितले. अपिल करणार यांच्या मतानुसार अशी माहिती निवड प्रक्रिया पूर्ण करण्यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार मागविणे गरजेचे होते, असे निदर्शनास आणून दिले.

वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी अपिल करणार यांच्याकडून छायांकित प्रती काढण्यासाठी झालेल्या खर्चाची रक्कम वसूल करुन, माहिती द्यावी असे कळविलेले आढळते. मात्र, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी वेळेत माहिती न दिल्यामुळे आणि अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस माहिती दिल्यामुळे, माहिती अधिकार कायदा, २००५ च्या कलम ७(६) मधील तरतुदींनुसार असा खर्च वसूल करता येणार नाही. अपिल करणार यांना प्रकल्पग्रस्त उमेदवाराचा जेष्ठता क्रमांक आणि उर्वरित माहिती उपलब्ध न झाल्याबाबत त्यांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून

२. <u>अपिल क्र.६/२०१०</u>

हे अपिल मुख्यत: श्रीयुत संदीप टोपे आणि डॉ.अनंत कांबळे यांच्या पदोन्नत्यांबाबत / नियुक्त्यांबाबत असल्याचे आढळते. त्यामध्ये उपस्थित करण्यात आलेल्या मुददयांबाबत चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

**मुद्दा क्र १ व २ :** मुद्दा क्र१ व २ याबाबत विधी शाखेने योग्य ती माहिती दिनांक १/४/२०१० च्या पत्राद्वारे माहिती अधिकारी यांना दिलेली होती. ती त्यांना प्राप्त झालेली असून, श्री टोपे आणि श्री कांबळे यांना पदावनत करण्यात न आल्याबाबत आणि त्यांच्याबाबतीत एक वरिष्ठ अधिका-यांची समिती नियुक्त करुन, सदरहू अहवाल जोडला असल्याचे स्पष्ट करण्यात आलेले आहे. सदरहू माहितीबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे अपिलकर्ता यांनी स्पष्ट केले.

**मुद्दा क्र.३ :** मुद्दा क्र.३ बाबत आस्थापना शाखेने श्री टोपे यांना कनिष्ठ वैज्ञानिक सहायक पदावरुन संवर्गबाह्य नियुक्ती दिली असल्याचे दिनांक २०/४/२०१० च्या पत्राद्वारे कळविले. मात्र, कोणत्या शासन परिपत्रकाद्वारे अशी नियुक्ती दिल्याची माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याचे अपिल करणार यांनी स्पष्ट केले.

**मुद्दा क्र.४ :** मुद्दा क्र.४ बाबत श्री संदीप टोपे हे क्षेत्र अधिकारी पदावर कार्यरत असल्याचे दिनांक २०/४/२०१० च्या पत्रानुसार कळविण्यात आलेले आहे.

**मुद्दा क्र.५ :** मुद्दा क्र.५ बाबत श्री कांबळे यांना शासन मान्यतेच्या अधीन राहून, अपंग कोट्यातून उप-प्रादेशिक अधिकारी पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात आलेली असल्याबाबत आणि दिनांक २३/३/२००७ च्या पत्राद्वारे सदरहू पदोन्नतीस शासन मान्यता प्राप्त झाल्याबाबत आणि ती नियमित नियुक्ती करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले होते.

अपिल करणार यांनी असे स्पष्ट केले की त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या सेवा भरतीसाठी अनुसरावयाची कार्यपध्दती याबाबत काढलेल्या परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्यात आले का? ही माहिती मागितलेली होती. वरील उत्तरातून त्याचा बोध होत नाही.

**मुद्दा क्र.६ :** मुद्दा क्र.६ बाबत आस्थापना शाखेने श्री कांबळे हे उप-प्रादेशिक अधिकारी पदावर कार्यरत असल्याचे स्पष्ट केलेले आहे.

**मुद्दा क्र.७ :** मुद्दा क्र.७ बाबत उप-प्रादेशिक अधिकारी या पदाची जेष्ठता यादी अद्ययावत करण्याचे कामकाज चालू असल्याचे कळविलेले आहे.

३. <u>अपिल क्र.७/२०१०</u>

सदरहू अपिलामध्ये मप्रनि मंडळाच्या आस्थापनेवर ११६ क्षेत्र अधिकाऱ्यांच्या निवडीबाबत माहिती विचारण्यात आलेली असून, त्यामधील मुद्यांबाबत योग्य ती चर्चा होऊन, खालीलप्रमाणे माहिती नोंदविण्यात आली.

**मुद्दा क्र.१** : अपिल करणार यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ५/११/२००९ च्या परिपत्रकानुसार मागासवर्गीय उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय नियुक्ती करु नये? असे स्पष्ट केलेले असल्यामुळे, नवीन निवड केलेल्या उमेदवारांमधील मागासवर्गीय उमेदवारांचे सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणीचे वैधता प्रमाणपत्र यांच्या छायांकित प्रतींची मागणी केलेली होती. तसेच, ज्या मागासवर्गीय उमेदवारांनी असे प्रमाणपत्र सादर केलेले नाही, त्यांची माहिती व त्यांच्या नियुक्त्या कोणत्या शासन परिपत्रकानुसार करण्यात आल्या, ही माहिती मागितलेली होती.

दिनांक २७/४/२०१० च्या पत्राद्वारे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी अशी माहिती न देता, ज्या उमेदवाराच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती हव्या आहेत, त्यांची नावे दिल्यास अशी माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे कळविलेले आहे. यावरुन, असे दिसून येते की, वरील माहिती एकतर अपूर्ण असावी किंवा उपलब्ध नसावी.

**मुद्दा क्र.२ :** मुद्दा क्र.२ बाबत असे स्पष्ट करण्यात आले की, महिला उमेदवाराचे नियमित नियुक्तीचे आदेश शासन निर्णय दिनांक २५/५/२००१ नुसार निर्गमित करण्यात आलेले आहेत. मात्र, नवीन निवड केलेल्या माहिला क्षेत्र अधिकारी यांच्याकडून, नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर केलेले आहे किंवा नाही आणि असल्यास त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नसल्याचे आढळते, जे सदरहू परिपत्रकाप्रमाणे बंधनकारक आहे.

**मुद्दा क्र.३ :** नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राबाबत माहिती उपलब्ध न करुन देता, ज्यांची माहिती अपिल करणार यांना हवी आहे त्यांची नावे दिल्यास अशी माहिती उपलब्ध करुन देता येईल असे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी दिनांक २७/४/२०१० च्या उत्तराद्वारे अपिल करणार यांना माहिती देण्याची मुदत संपल्यानंतर कळविल्याचे आढळते. तसेच, मूळ प्रश्न मागास प्रवर्गातील वैध असलेले नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी सादर केले का, असल्यास त्याची माहिती आणि नसल्यास, अशा उमेदवारांची माहिती अपिल करणार यांनी मागितलेली होती. पण, ती दिली नसल्याचे स्पष्ट होते.

**मुद्दा क्र.४ :** मुद्दा क्र.४ बाबत वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी शासन निर्णयानुसार बिंदुनामावलीचे अनुपालन केले आहे असे कळविले. मात्र, त्यामध्ये अपिल करणार यांच्यानुसार मूळ प्रश्न १०० बिंदुनामावली निश्चित करण्यात आली होती का?, त्या बिंदुनामावलीस प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांची मान्यता घेतली का?, असल्यास, ती माहिती देणेबाबत विचारणा करण्यात आलेली होती. मात्र, त्याबाबत कोणताही उल्लेख उत्तरामध्ये आढळत नाही.

**मुद्दा क्र.५ :** मुद्दा क्र.५ बाबत वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी दिनांक २७/४/२०१० च्या पत्राद्वारे शासन निर्णयानुसार व सेवा प्रवेश नियमानुसार वयामध्ये शिथिलता दिली आहे असे उत्तर दिलेले आहे. मात्र वयाची सवलत देण्यासाठी शासनाचे परिपत्रक आहे का?, असल्यास त्याची प्रत उपलब्ध करुन देणे हे कंत्राटी पध्दतीवर किंवा ठराविक मानधनावर नियुक्त केलेल्या क्षेत्र अधिकारी या पदाच्या खालच्या पदावरील उमेदवाराबाबत कोणतीही माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

**मुद्दा क्र.६** : मुद्दा क्र.६ बाबत शासन निर्णय, शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे आणि उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेच्या प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती यास काही कालावधी लागणार असल्यामुळे, कार्यवाही पूर्ण झाल्यावर उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. मात्र, अद्यापपावेतो अपिल करणार यांस प्रशासकीय विभागाकडून अशी माहिती उपलब्ध झाली नसल्याचे स्पष्ट करण्यात आलेले आहे.

४. **अपिल क्र.८/२०१०** :

सदरहू अपिल मुख्यत: वैज्ञानिक व तांत्रिक संवर्गातील वर्ग-१ व वर्ग-२ अधिकाऱ्यांच्या बिंदुनामावलीबाबत असून, त्यामध्ये झालेल्या चर्चेनुसार खालीलप्रमाणे नोंद घेण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.१** : वैज्ञानिक व तांत्रिक संवर्गातील वर्ग-१ व वर्ग-२ अधिकाऱ्यांच्या बिंदुनामावलीच्या छायांकित प्रती दिनांक २७/४/२०१० च्या पत्राद्वारे देण्यात आलेल्या असल्याचा उल्लेख आहे. अपिल करणार यांनी सदरहू नोंदी दरवर्षी प्रमाणित करणे गरजेचे असल्याचे व त्याप्रमाणे अद्ययावत माहिती ठेवली नसल्याचे स्पष्ट केले.

**मुद्दा क्र.२** :वैज्ञानिक व तांत्रिक संवर्गातील वर्ग-१ व वर्ग-२ अधिकाऱ्यांच्या बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी पर्यावरण विभागामार्फत करणे गरजेचे नसल्याचे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी वरील पत्रानुसार कळविले. अपिल करणार यांनी शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२००५/प्रक्र.२९१/०९/९६-ब नुसार अशी तपासणी करणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले.

**मुद्दा क्र.३** : पर्यावरण विभागाने वैज्ञानिक व तांत्रिक संवर्गातील वर्ग-१ व वर्ग-२ अधिकाऱ्यांच्या बिंदुनामावलीची प्राथमिक तपासणी केल्यानंतर, सामान्य प्रशासन विभाग यांची बिंदुनामावलीस मान्यता घेतली जात नसल्याचे मात्र, ती शासनाच्या नियमाप्रमाणे वापरली जात असल्याचे स्पष्ट केले. अपिलीय प्राधिकरणास असे स्पष्ट आढळून आले आहे की, बिंदु नामावलीबाबत अनेक हरकतीचे मुद्दे उपस्थित होत असून,याबाबत शासन नियमाप्रमाणे योग्य ती प्राथमिक तपासणी करुन, आणि सामान्य प्रशासन विभागाकडून मान्यता

घेऊनच, बिंदुनामावली वापरणे गरजेचे आहे. याबाबतीत मप्रनि मंडळाने योग्य ती समिती नेमुन, योग्य ती कार्यवाही करणे गरजेचे आहे.

**मुद्दा क्र.४** : अपिल करणार यांनी खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गांच्या जागांवर बिंदुनामावली प्रमाणे पदोन्नती/नियुक्त्या केलेल्या आहेत का ? अशी माहिती मागितलेली आढळते. त्याबाबत, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी दिनांक २७/४/२०१० च्या पत्राद्वारे नाही असे उत्तर दिलेले आढळते. अपिल करणार यांच्या मताप्रमाणे हे उत्तर सयुंक्तिक नसून, बिंदु नामावलीचे उल्लंघन करणारे आढळते.

वरील अपिलांमध्ये असे आढळून येते की, अपिल करणार यांनी चारही अपिलांमध्ये मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील विहित मुदतीमध्ये दिलेली नाही. अशाच प्रकारचा अनुभव आस्थापना विभागाशी संबंधीत असणाऱ्या अर्जांबाबतच्या माहितीबाबत अपिल प्राधिकरणास आलेला आढळतो. त्यामुळे विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे, अनेक अपिल्स या अपिल प्राधिकरणापुढे दाखल करण्यात येत असून, अपिल सुनावणीच्या दरम्यान आस्थापना विभागाकडून अर्धवट माहिती उपलब्ध करुन देण्यात येते. त्यामुळे, कारण नसताना माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे उल्लंघन होऊन अपिलांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे व त्याचा माहिती अधिकारी आणि अपिलीय प्राधिकरण यांना देखील अर्जदारांबरोबर त्रास होत आहे. तसेच, सदरहू अधिनियमातील कलम ५(५) प्रमाणे वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी हे मानीव (deemed) माहिती अधिकारी ठरतात.

वरील कारणास्तव अपिल करणार यांनी माहिती अधिकारी यांच्यावर सेवा नियमानुसार सक्ती ठेवण्याचे अधिकार अपिलीय अधिकारी यांना आहेत व त्याप्रमाणे त्यांनी सक्ती ठेवण्यात यावी व त्याची नोंद माहिती अधिकारी यांच्या सेवापुस्तकात करण्यात येऊन, त्याची प्रमाणित प्रत अपिल करणार यांना द्यावी अशी प्रार्थना केलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी हे माहिती अधिकाऱ्यास माहिती देण्यास मुख्यत: जबाबदार असल्यामुळे, सदरहू माहिती ते देत नसल्यामुळे वरील परिस्थिती उद्‌भवल्यामुळे, सदस्य सचिव यांनी याबाबत सर्व अभिलेख मागवून, संबंधीत माहिती अधिकारी आणि अपिलीय प्राधिकरण यांच्याकडून असा अभिलेख

मागवून, याबाबतीत योग्य ती चौकशी करुन, योग्य तो निर्णय घेणे इष्ट होईल, असे अपिलीय प्राधिकरणाचे मत आहे.

वरील परिस्थितीमध्ये प्रशासकीय विभागाने अपिल करणाऱ्या अपिलकर्त्याच्या सर्व अर्जांचा योग्य तो परामर्ष घेऊन, जास्तीत जास्त माहिती उपलब्ध करुन द्यावी, तसेच, सदरहू माहिती कोणत्याही परिस्थितीमध्ये १५ दिवसांच्या आत द्यावी. इतर माहिती अर्जांमध्ये देखील प्रशासन विभागामध्ये स्वतंत्र सहाय्यक/माहिती अधिकारी नेमुन, त्याचा निपटारा माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार विहित वेळेमध्ये करावा, जेणेकरुन, मप्रनि मंडळाच्या विधी विभागातील माहिती अधिकारी, सहाय्यक माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकरण आणि मुख्यत: अर्जदार यांना कोणताही त्रास होणार नाही व कायद्यातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन होईल, अन्यथ: अपिलीय प्राधिकरणास नाईलाजास्तव प्रशासकीय विभागास जबाबदार धरुन, मानीव माहिती अधिकारी समजून, योग्य ते आदेश देणे गरजेचे होईल, याची नोंद घ्यावी

दिनांक २८ एप्रिल, २०१० दिवशी मुंबई येथून,

( द. त्रि. देवळे )

प्रथम अपिलीय अधिकारी